**Lang. Code : 11**

इस पुस्तिका में **20** पृष्ठ हैं ।
This booklet contains **20** pages.

# AAT-20-I

**प्रश्न-पत्र I / PAPER I**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग IV & V / PART IV & V**

**परीक्षा पुस्तिका संकेत**
**Test Booklet Code**

**I**

**परीक्षा पुस्तिका संख्या**
**Test Booklet No.**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें । / For instructions in Marathi see Page 2 of this Booklet.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **I** । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा I - (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा II - (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **I**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language I - (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language II - (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ______
Name of the Candidate (in Capitals) :
अनुक्रमांक : (अंकों में) ______
Roll Number : in figures
: (शब्दों में) ______
: in words
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ______
Centre of Examination (in Capitals) :
परीक्षार्थी के हस्ताक्षर : ______ निरीक्षक के हस्ताक्षर : ______
Candidate's Signature : Invigilator's Signature :
Facsimile signature stamp of
Centre Superintendent ______

I

**Lang. Code : 11**

ही पुस्तिका **20** पानांची आहे.

# AAT-20-I

**प्रश्नपत्रिका I**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**I**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I, भाग II आणि भाग III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड I** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू**-2 वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग IV : भाषा I – (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग V : भाषा II – (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of

Centre Superintendent ______________________

परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120),** if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

## भाग – IV
## भाषा – I
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्र. 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

राजकारणी, समाजसुधारक यांनी समाज घडवला, उन्नत केला, पण समाजाला सुसंस्कृत केलं, त्याची अभिरुची घडवली ती कलावंत-कलाकारांनी. माणसाचा इतिहास जिथपासून माहित आहे, तिथपासून माणसाचं मन कोणत्या ना कोणत्या कलाविष्कारांमध्ये गुंतलेलं दिसतं. आपल्या भावना, विचार, मनात उठणारे तरंग, उरी बाळगलेली स्वप्नं, शब्दांत व्यक्त होऊ शकणार नाहीत अशा कल्पना, आपला विरोधी सूर, अबोध मनाच्या कोपऱ्यात चाललेली खळबळ आदींचा आविष्कार करण्यासाठी माणूस कोणत्या ना कोणत्या कलेचं माध्यम अगदी सुरुवातीपासून वापरत आला आहे. जेव्हा संवादाची भाषा निर्माण झाली नव्हती, तेव्हाही कलांद्वारेच संवादाचे सेतू उभारले गेले.

दूसऱ्या सहस्रकात पृथ्वीच्या पाठीवर जिथे कुठे संधी लाभली, तिथे कलावंतांनी मानवी इतिहासाला पुढे नेणाऱ्या अजरामर कलाकृती सादर केल्या. कधी राजाश्रयाने तर कधी सत्ताधाऱ्यांचा रोष पत्करून, कधी अनुकूल परिस्थितीत, तर कधी प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी उच्च कलाविष्कार केला, त्या-त्या काळाचं समाजचित्रण केलं; सूक्ष्म निरीक्षणं नोंदवली; न रुचणाऱ्या गोष्टींबद्दल नकार नोंदवले; तरल संवेदना व्यक्त केल्या. अशा कलाकृतींद्वारे त्यांनी कधी समाजाला प्रभावित केलं, तर कधी विचारप्रवृत्तही केलं.

चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला, अभिनय, नृत्य, नाट्य, गायन, संगीत ते चित्रपटनिर्मिती अशा अनेकविध कला रुजल्या, विस्तारल्या, बहरल्या. लोकांनी त्या कलाकृतींना वा कलाकारांना कधी डोक्यावर घेतलं, तर कधी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली.

कलाकारांनी उच्च दर्जाच्या कलाकृतींमधून लोकांना आनंद दिला, त्याचप्रमाणे त्यांच्या आंतरिक व्यथा, वेदनाही सर्जनशीलतेने अभिव्यक्त केल्या. एखाद्या कुंचल्याचा फटकारा, एखादी मर्मभेदी तान, छेडलेली तार, संवेदनांची तीव्रता व्यक्त करणारं एखादं गाणं, एखादाच पदन्यास किंवा एखादंच बोलकं दृश्य लाखो-करोडो लोकांमध्ये क्षणार्धात कंपनं निर्माण करण्यास पुरेसं झालं, हा कलाक्षेत्राचा इतिहास आहे. असा उच्च निर्मितीचा, सृजनाचा क्षण पकडण्यासाठी आसुसणाऱ्या कलावंतांनी भौतिक सुखाची पर्वा केली नाही; हालाखीत दिवस काढले, हा सुध्दा इतिहास आहे. या कलावंतांनी मानवी जीवन समृद्ध केलं. सामाजिक राहणीमानाला परिमाण दिलं; माणसाच्या अभिरुचीवर, सौंदर्यदृष्टीवर सुसंस्कार केले; विचारांची क्षितिजं विस्तारली; जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन निर्माण केला.

या सहस्रकांत नानाविध कलाकारांनी आपल्या परिसस्पर्शाने मानवी संस्कृतीला आकार दिला व तिचं संवर्धन केलं. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मानवी समाजाला विधायक दृष्टी देणारे असे सर्जनशील कलावंत जगाच्या कानाकोपऱ्यांत होऊन गेलेले आढळतात.

**91. सर्जनशीलतेचा क्षण पकडण्यासाठी कलावंतांनी कोणत्या गोष्टीची तमा बाळगली नाही ?**

(1) भौतिकसुख

(2) संवेदनांची तीव्रता

(3) सौंदर्यदृष्टी

(4) परिसस्पर्श

**92. वरील उताऱ्यात लेखकाने प्रामुख्याने कोणाचे वैशिष्ट्य अधोरेखित केले आहे ?**

(1) समाजकारण्यांचे योगदान

(2) राजकारण्यांचे योगदान

(3) सर्जनशील कलावंतांचे योगदान

(4) कलाक्षेत्राचा इतिहास

**93. 'आनंद', 'कीर्ति', 'व्यथा', 'सौंदर्य' हे शब्द कशाचे उदाहरण आहे ?**

(1) भाववाचक नाम

(2) सामान्य नाम

(3) विशेषनाम

(4) विशेषण

**94. 'व्यापक' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द सुचवा.**

(1) व्याकूळ

(2) संकुचित

(3) व्यस्तचलन

(4) संयुक्त

**95. समाजाकडून कलावंतांना प्रसंगी कोण–कोणत्या प्रकारचा प्रतिसाद मिळाला ?**

(1) संवादाचे सेतू व कुंचल्याचे फटकारे

(2) भौतिक सुख व हालाकीचे दिवस

(3) संवेदनांची तीव्रता व सौंदर्य दृष्टी

(4) अतोनात स्तुती तर कधी खरपूस समाचार

**96. लेखकाच्या मते समाजाचे राहणीमान कशामुळे सुस्कांरित झाले ?**

(1) राजाश्रय

(2) कलावंत

(3) मर्मभेदी तान

(4) उच्च कलाविष्कार

**97. मानवी इतिहास पुढे नेण्यासाठी कलावंतांनी काय केले ?**

(1) संवादाचे सेतू उभारले

(2) अजरामर कलाकृती सादर केल्या

(3) वेदना अभिव्यक्त केल्या

(4) संस्कृतीला आकार दिला

**98. संवादाची भाषा निर्माण होण्यापूर्वी कोणत्या माध्यमांतून माणसा–माणसात संवाद निर्माण होत असे ?**

(1) विविध कला

(2) मनात उठणारे तरंग

(3) माणसाचा इतिहास

(4) संवेदनांती तीव्रता

**99. 'आसुसणे' या शब्दाची नेमकी अर्थच्छटा व्यक्त करणारा पर्याय निवडा.**

(1) एखादी वस्तू ओरबाडणे

(2) हपापलेपणा

(3) तीव्र इच्छाशक्ती

(4) हावरटपणा

**पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्र. 100 ते 105 साठी योग्य पर्याय निवडा.**

मानूस मानूस मतलबी रे मानसा
तुले फार हाव तुझी हाकाकेल आशा
मानसा मानसा तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं गोठ्यातलं जनावर
भरला डाडोर भुलीसनी जातो सूद
खाईसनी चारा गायम्हैस देते दूध
मतलबासाठी मान मानूस डोलये
इमानाच्यासाठी कुत्रा शेपूट हालये
मानसा, मानसा, कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस

**100. 'हाव' शब्दाचा समानार्थी आशय कोणता ?**

(1) लोभ
(2) हात
(3) हित
(4) लोह

**101. कवायित्रीच्या मते आपला मतलब साध्य करण्यासाठी माणूस काय करतो ?**

(1) उपकार
(2) हावरटपणा
(3) कृतज्ञता
(4) कृतघ्नता

**102. माणसाकडून कोणती साधी अपेक्षा कवयित्रीने व्यक्त केली आहे ?**

(1) मान डोलावण्याची
(2) विस्मरणाची
(3) मतलबीपणाची
(4) माणसासारखे वागण्याची

**103. माणसापेक्षा कोण अधिक चांगलं असं कवयित्रीला वाटतं ?**

(1) कुत्रा
(2) गोठ्यातलं जनावर
(3) चारा
(4) गोठा

**104. माणसाची कोणती वृत्ती कवयित्रीला चांगली नाही असे वाटते ?**

(1) हाव
(2) आशा
(3) नीयत
(4) इमान

**105. सामान्य नाम नसलेला पर्याय शोधा**

(1) इमान
(2) गाय
(3) म्हैस
(4) कुत्रा

**योग्य पर्याय निवडून प्रश्न क्र. 106 ते 120 या प्रश्नांची उत्तरे द्या :**

**106. व्याकरण शिकवण्यासाठी पुढीलपैकी कोणती पद्धत परिणामकारक ठरेल ?**

(1) व्याकरणाचे नियम सांगणे आणि उदाहरणे देणे.

(2) भाषांतर करताना व्याकरणाचे नियम सांगणे.

(3) व्याकरणाच्या पुस्तकाच्या आधारे व्याकरण शिकवणे.

(4) संदर्भ देऊन व्याकरणाच्या नियमांचा उलगडा करून दाखवणे.

**107. 'सामाजिक आदान–प्रदान' या कल्पनेचा संबंध कोणाशी आहे ?**

(1) पाणिनी

(2) स्किनर

(3) व्यगोस्त्की (Vygotsky)

(4) कोहलबर्ग

**108. भाषा आत्मसात करताना पुढीलपैकी कोणती बाब मुलांना मदतरूप ठरते ?**

(1) बोलण्याची फारसी संधी नसलेले कौटुंबिक वातावरण

(2) परस्परांशी संभाषण करणाऱ्या घरातील मोठ्या माणसांचे सानिध्य

(3) मुलाला योग्य वाक्य/उच्चार याची पुनरावृत्ती करण्यास सांगणे.

(4) इतर मुलांसोबत खेळणे.

**109. पुढीलपैकी कोणत्या परिस्थितीत मुलं नैसर्गिकरित्या भाषा आत्मसात करतात ?**

(1) एकावेळेस फक्त एक भाषा बोलणे.

(2) सभोवतालच्या पर्यावरणात एकापेक्षा अधिक भाषा असणे.

(3) फक्त लिखित आणि संचार माध्यमांमुळे.

(4) त्या भाषेची व्याकरणिक संरचना

**110. संहिता वाचनाच्या बाबतीत कोणती गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे ?**

(1) संहितेतील प्रत्येक शब्द वाचणे.

(2) विरामचिन्हांवर भर देणे.

(3) संहितेचा अर्थ लावणे.

(4) योग्य उच्चारणासह मोठ्याने वाचणे.

**111. पुढीलपैकी कोणते भाषा शिक्षणाचे उद्दिष्ट नाही ?**

(1) समजून वाचण्याची क्षमता

(2) प्रयत्नपूर्वक विचार मांडणे

(3) जे ऐकलं ते समजण्याची क्षमता

(4) सुसंगत लेखन–कौशल्य विकास

**112. ध्वनिशास्त्रीय जागरुकतेचा संबंध कोणाशी आहे ?**

(1) श्रवण क्षमता

(2) संभाषण क्षमता

(3) वाचन क्षमता

(4) लेखन क्षमता

**113. नाओम चॉम्स्कींच्या मते भाषेच्या संदर्भात कोणती गोष्ट मुलांमध्ये जन्मतः असते ?**

(1) आत्मसात करणे

(2) अनुकरण करणे

(3) रूपांतरण करणे

(4) अनुवाद करणे

**114. भाषिक कौशल्य कशाप्रकारे शिकवले गेले पाहिजे ?**

(1) अनुकरणातून

(2) एकाकीपणे

(3) सविस्तरपणे समजावून

(4) समग्रपणे शिकवून

**115. शिक्षिका मुलांना चित्र काढणे आणि रंग भरण्यास प्रवृत्त करते. यातून ती काय साध्य करु इच्छिते ?**

(1) वर्गात शांतता राखण्यासाठी मुलांना कामाला लावणे.

(2) क्रियात्मक क्षमता (Motor skill) विकसित करणे.

(3) उदीयमान बाल कलावंतांना संधी देणे.

(4) मुलांना नियुक्त कार्यात सहभागी करणे

**116. मौखिक भाषा क्षमता विकसित करण्यासाठी पुढीलपैकी कोणता सराव सर्वात मदतरूप ठरतो ?**

(1) कवितेचे एकट्याने आणि सामूहिक अभिवाचन

(2) भूमिकाभिनय

(3) शिक्षिकेच्या पाठोपाठ पाठाचे सामूहिक वाचन

(4) शिक्षिकेच्या पाठोपाठ शब्दांचे सामूहिक उच्चारण

**117. इयत्ता तिसरीची शिक्षिका मुलांना पाठातील कथेच्या घटनांची योग्यक्रमाने मांडणी करण्यास सांगते. असे केल्यामुळे कोणती वाब सुधारते ?**

(1) वाचन आकलन

(2) आकलनात्मक आदान

(3) लेखन क्षमतेत वाद

(4) मुळांच्या संभाषण वेळेत वाद

**118. इयत्ता दुसरीची शिक्षिका वर्गात वेगवेगळया वस्तूंवर त्यांचा परिचय करुन देणाऱ्या पट्टया चिकटवते. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वस्तू आणि शैक्षणिक साहित्य यांचा सहसंबंध जुळवता येतो. असे केल्याने विद्यार्थ्यांच्या कोणत्या क्षमतेत भर पडते ?**

(1) व्याकरण

(2) लेखन कौशल्य

(3) शब्दसंग्रह

(4) अक्षर लेखन

**119. मुलाच्या भाषिक क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी पुढीलपैकी कोणती पध्दती कमी महत्त्वाची आहे ?**

(1) कथा–कथन

(2) कथा–लेखन

(3) घटना–वृत्तांत लेखन

(4) लेखन सराव

**120. विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता विकसित करण्यासाठी पुढीलपैकी कोणता प्रश्न विचारणे अधिक मदतरूप ठरेल ?**

(1) तुम्हाला आवडलेल्या पुस्तकांचे नाव सांगा.

(2) 'पसंती' या शब्दाचा वापर करून एक वाक्य तयार करा.

(3) आपला आईसोबतचा एखादा संवाद लिहा.

(4) तुम्ही वाचलेल्या कवितेच्या कवीचे नाव सांगा.

परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150),** if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

## भाग – V
## भाषा – II
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

प्राण्यांच्या झोपेबद्दल माणसाला बराच काळ कुतुहल वाटत आलेलं आहे. आपल्या संतांनाही प्राण्याच्या झोपेबद्दल कुतुहल होतंच. जिराफासारखा अतिप्रचंड प्राण्याला भरपूर चरून दोन पाच किलोमीटरची दौड करून, दिवसभरात चारा शोधत दहा पंधरा किलोमीटर चालल्यावर केवळ २० मिनिटांची झोप पुरी वाटते, हे ऐकून बऱ्याच कुंभकर्णांना हेवा वाटेल. सरीसृप आणि उभयचरी प्राणी विश्रांतीसाठी मृतवत पडून राहतात, मात्र ते कधीच गाढ झोपत नाहीत. त्यांची झोप अतिशय सावध असते.

प्राण्यांना दिवसभरात झोप मिळो अथवा न मिळो ते उड्या मारणे, पळणे, पंख फडफडवणे आणि अचूक झोप घेणे किंवा झडप मारणे या गोष्टी करू शकतात. माणसाला मात्र झोप मिळाली नाही तर त्याचे अतिशय हाल होतात. असं असलं तरी आपल्याला आठ तासांची झोप पुरेशी होते. आपल्यापेक्षा बराच जास्त काळ झोपणारेही प्राणी आहेत. कोआला चोवीसा तासातले अठरा तास झोपेत घालवतात. खारी चौदा तास झोपतात तर सिंह सोळा तास.

प्राण्या-प्राण्यांमधील झोपेच्या आवश्यकतेचा हा फरक प्राणी वर्तणूक शास्त्रज्ञांना बुचकळ्यात पाडत आला आहे. झोपेच्या आवश्यकतेसंबंधी सध्या दोन विचार प्रचलित आहेत. ह्या दोन्ही गटातले शास्त्रज्ञ आपले विचार सुधारण्यास वाव आहे, हे मान्य करतात. एका गटाच्या मते झोप ही शारीरिक तसंच मानसिक ताकद भरून काढण्यासाठी आवश्यक असते. फक्त शरीराची शक्ती पूर्ववत करायची असेल तर आरामात डोळे उघडे ठेवून भागण्यासारखं आहे. मानसिक थकवा भरून काढायचा असेल, दिवसभर घडलेल्या घटना आणि त्यांचे अन्वयार्थ लावायचे असतील तर स्वप्नांसह झोप आवश्यक असते. आपल्या स्मरणसाठ्यात विविध घटना साठवल्या जातात, त्यांची वर्गवारी झोपेत करून त्या योग्य त्या कप्प्यात ढकलल्या जातात. त्यावेळी काही घटना आणि तत्संबंधित विचार स्वप्नरूपानं आपल्या झोपेत प्रकट होत असतात.

रोज रात्री माणसाला पाच वेळा स्वप्नं पडतात. सकाळी ती विसरली जातात. जेव्हा ह्या स्वप्नांच्या काळात माणसाला झोपू दिलं जात नाही, तेव्हां तो सकाळी गोंधळलेल्या मनःस्थितीत आढळतो. जर ही स्वप्नांची झोप पूर्ण झाली तर तो ताजातवाना असतो; आणि सकाळी उत्साहानं कामाला लागतो.

**121. स्वप्नांच्या माध्यमातून आपल्या कोणत्या गोष्टी व्यक्त होतात ?**

(1) घटनांची वर्गवारी

(2) घटनांचे अन्वयार्थ

(3) स्मरणसाखळीतील घटना

(4) गोंधळलेली मनःस्थिती

**122. 'उभयचर प्राण्यांची झोप <u>अतिशय</u> सावध असते' वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात शोधा.**

(1) विशेषनाम

(2) विशेषण

(3) संख्याविशेषण

(4) क्रियापद

**123. "सामग्रीचे एकजिनसी किंवा गुणधर्मानुसार भिन्न गटांमध्ये विभाजन करण्याची प्रक्रिया." या शब्दसमूहासाठी योग्य शब्द सुचवा.**

(1) अन्वयार्थ

(2) वर्गवारी

(3) पूर्ववत

(4) स्मरणसाठा

**124. पुढील पर्यायांपैकी विशेषनाम नसलेला पर्याय निवडा.**

(1) जिराफ

(2) कोआला

(3) कुंभकर्ण

(4) सरीसृप

**125. लेखकाच्यामते सकाळी माणसाची गोंधळलेली अवस्था केव्हां होते ?**

(1) मानसिक थकवा आल्यामुळे

(2) स्वप्नांची सोप पूर्ण झाल्यामुळे

(3) शारीरिक थकवा आल्यामुळे

(4) स्वप्नांच्या काळात जागरण साल्यामुळे

**126. पुढीलपैकी 'कुतुहल' शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.**

(1) उत्सुकता

(2) कुशाग्रता

(3) उमाळा

(4) कुमक

**127. 'बुचकळ्यात पडणे' हा आशय कोणत्या पर्यायातून व्यक्त होत नाही ?**

(1) साशंक होणे

(2) पेचात पडणे

(3) संशय निर्माण होणे

(4) केसांचा पुंजका होणे

**128. लेखकाच्या मते मानसिक विश्रांतीसाठी कोणती गोष्ट गरजेची आहे ?**

(1) स्वप्नासह झोप

(2) गोंधळलेली स्थिति

(3) चोवीसतास झोप

(4) झोपेबद्दल कुतुहल

**पुढील उतारा वाचा आणि प्र.क्र. 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायाची निवडा.**

शाळेच्या गणवेशातच खाकी चड्डी होती. त्यामुळे अघळपघळ खाकी चड्डी अंगाला कायम चिकटलेलीच असे. या जाड कापडी चड्डीला दोन बाजूंना दोन खिसे. जणू छोटे गोदामच. या खिशात तिरपा हात घालावा लागे. रिकाम्या खिशात हात घालून चाललं तरी ऐट वाटायची. खिशात चांगली ऐसपैस जागा होती. बऱ्याचदा उपयोगी खजिना या खिशांत कोंबलेला असे. तुरीच्या शेंगा, पेरू, बोरं, कैऱ्या, चिंचा, रेवड्या, शेंगदाणे, फुटाणे, मुरमुरे, चिक्की, खोबरं, संत्री गोळ्या, बिस्किटं असं काय काय ठेवण्यासाठी या खिशांचा उपयोग होई. कधीतरी जांभळीखालची वेचलेली जांभळं या खिशात ठेवण्याचा प्रयत्न महागात पडला. जांभळांच्या डागामुळे खराब झालेली चड्डी आणि त्यापेक्षा भयंकर म्हणजे जांभळाऐवजी खाव्या लागलेल्या शिव्या अधिक तुरट होत्या. कधीही रिकाम्या नसणाऱ्या खिशाचे हे सर्वसाधारण उपयोग झाले. पण आम्ही बऱ्याचदा या खिशाचा उपयोग समोरच्याला चकित करण्यासाठी करत असू. म्हणजे खिशातून एखदी दुर्मिळ, वेगळी वस्तू बाहेर काढायची. ती वस्तू मित्रांना दाखवून चकित करायचं असा हेतू असे. काड्याच्या डबीवरचं नवनवं चित्र, सिगारेटच्या पाकिटात मिळणारा चमकीचा कागद, शंख, शिंपले, गारगोटी, चिंचोके, सीताफळाच्या बिया, रेल्वेची जाड तिकिटं, सापडलेले मणी, जुनी नाणी, रंगीत पंख, रंगीत खडू, ढब्बू पेन असं काहीही जादूने काढल्यासारखं खिशातून काढून मित्राला दाखवण्यात मौज होती. एकदा रानात सापडलेली मोरपिसं मी या खिशात कोंबली होती. शाळेच्या सहलीत नदीत साडलेलं कासवाचं पिल्लू खिशात ठेवण्याचा अयशस्वी प्रयत्न आम्ही केला होता. एकाच्या खिशात कोंबडीचं पिल्लू गुदमरलं होतं. एका मित्राने खिशातून सापाची कात काढून आमच्यासमोर धरली होती. अशा विचित्र वस्तूंमुळे खिसा श्रीमंत व्हायचा. या काही वेळा या वस्तूंची अदलाबदलही व्हायची. बऱ्याचदा या वस्तू रात्री अंथरुणात आमच्यासोबत झोप घेत. त्यामुळे सकाळी कपडे धुताना आई कपड्याची तपासणी करे. खिशात सापडलेल्या अद्भुत वस्तू नहाणीच्या कोनाड्यात काढून ठेवत असे. दरम्यान, आमच्या खिशात नवीन वस्तू आलेली असे.

काळ बदलला. स्वाभाविकपणेच माहोलही बदलला. शाळा, गणवेश आणि त्यापेक्षाही मानसिकता बदलली. खाकी चड्डी गेली. आताच्या बर्मुडाला लहान मोठे खूप खिसे आहेत. पण हे खिसे भरलेले नाहीत, रिकामे आहे. मग आजची मुलं मुली एकमेकांना चकित करीत नाहीत का ? तर आजह चकित केलं जातंय, फक्त त्याचं स्वरूप बदललंय. ते एकमेकांना त्यांच्या मोबाइलमधले गेम, चित्रफिती दाखवतात.

**129. लेखकाने सांगितल्यापैकी त्याच्या खिशात कोणता पदार्थ नसे ?**

(1) जुनी नाणी

(2) रंगीत खडू

(3) चित्रफिती

(4) संत्री गोळ्या

**130. लेखकाला बालपणात कोणती कृती महागात पडली ?**

(1) खिशात हात घालून चालण्याची

(2) सीताफळाच्या बिया खाण्याची

(3) वस्तूंची अदला-बदल कराचयी

(4) जांभळं खिशात ठेवण्याची

**131. लेखकाच्या मते आता कोणत्या बाबतीत परिवर्तन झालंय ?**

(1) रेल्वे तिकिटांच्या

(2) चकित करण्याच्या

(3) कपड्यांची तपासणी करण्याच्या

(4) रिकामा खिशाच्या

**132. 'मौज' शब्दाचा समानार्थी नसलेला पर्याय शोधा.**

(1) करमणूक

(2) आनंद

(3) स्तब्ध

(4) सुखद

**133. 'जाड कापडी चड्डीला दोन खिसे असत.' वाक्यातील अधोरेखित शब्द काय आहे ?**

(1) क्रमवाचक विशेषण

(2) संख्या विशेषण

(3) गणनावाचक विशेषण

(4) पृथकतावाचक विशेषण

**134. पुढीलपैकी भाववाचक नाम शोधा.**

(1) मुरमुरे

(2) खडू

(3) मित्रता

(4) रंगीत पंख

**135. लेखक आपल्या कोणत्या कृतीतून सवंगड्यांना स्तिमित करीत असे ?**

(1) बर्मुडा दाखवून

(2) खिशातील वस्तू दाखवून

(3) खिशात तिरपा हात घालून

(4) कासवाचं पिल्लू दाखवून

**योग्य पर्याय निवडून प्रश्न क्र. 136 ते 150 या प्रश्नांची उत्तरे द्या :**

**136. मुलाच्या भाषा ग्रहणाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्त्वाची ठरते ?**

(1) शिक्षक

(2) कुटुंब

(3) शाळा

(4) संचार माध्यमे

**137. व्याकरणाचे नियम पाठ करण्यासाठी पुढीलपैकी कोणता घटक केन्द्रस्थानी असतो ?**

(1) संरचनात्मक भूमिका

(2) थेट भूमिका

(3) व्याकरण अनुवाद पद्धती

(4) नैसर्गिक पद्धती

**138. भाषा शिकण्यासाठी पुढीलपैकी कोणती गोष्ट महत्त्वाची नाही ?**

(1) अभिप्रेरण

(2) आत्मविश्वास

(3) शिकण्याकडे असणारा कल

(4) भाषांतर

**139. मुलांना लेखन शिकवताना एक शिक्षक म्हणून तुम्ही काय कराल ?**

(1) मुलानां भाषेची बाराखडी लिहायला सांगणे.

(2) मुलांना आपले विचार–लिहून काढण्यास सांगणे.

(3) मुलांना एखादा परिच्छेद पाठकरून चांगल्या अक्षरात लिहायला सांगणे.

(4) मुलांना फळ्यावर काढलेले अक्षर लिहून काढण्यास सांगणे.

**140. मुलांसाठी शिक्षण–सामग्रीची निवड करताना कोणता मुद्दा सर्वात महत्त्वाचा ठरतो ?**

(1) सामग्री जवळपासच्या बाजारात उपलब्ध असणे.

(2) सामग्री फार महागडी नसणे.

(3) सामग्री मुलांनी तयार केलेली असणे.

(4) सामग्री प्रसंगानुरूप असणे आणि एकात्मीकृत रूपाने वापरता येणे.

**141. दुसऱ्या इयत्तेतील काही मुलांना काही ध्वनींच्या उच्चारणात अडचण येचे. त्यांची ही अडचण दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना सर्वात परिणाम–कारक ठरेल ?**

(1) मानव मुखाच्या प्रतिकृतीचा आधार घेऊन विशिष्ट ध्वनींचा उच्चार कसा करायचा हे दाखवणे.

(2) शिक्षिकेने लहान–लहान शब्दांचा आधार घेणे–म्हणजे शब्द यमकांचा आधार घेणे, त्यांना उच्चार करण्यास सांगणे आणि शब्दातील ध्वनी ओळखण्यास सांगणे.

(3) संहितेचे मोठ्याने वाचन करून त्या विशिष्ट ध्वनींवर भर देऊन समजावणे.

(4) मुलांना सराव करण्यास सांगणे जेणेकरून त्याच त्या ध्वनींचा पुनःपुन्हा वापर करून अडचण दूर करणे.

**142. व्याकरणाच्या नियमांवर भर देणे आणि त्यासंबंधीची अनेक उदाहरणे देऊन शिकविण्याची पद्धत म्हणजे ...**

(1) उद्‌गामी पद्धती

(2) निगमन पद्धती

(3) व्याकरण भाषांतर पद्धती

(4) थेट पद्धती

**143. शिकणारा भाषा कशाप्रकारे आत्मसात करतो ?**

(1) नैसर्गिक भाषिक पर्यावरणात भाषेच्या वापरातून

(2) भाषिक संरचनेच्या मूल्यमापनातून

(3) संबंधित भाषेच्या साहित्य वाचनातून

(4) संबंधित भाषा बोलणाऱ्यांच्या संस्कृतीचा अभ्यास करून

**144. पुढीलपैकी कोणती बाब क्रियात्मक क्षमतेचा (Motor Skill) विकास करण्याचे उदाहरण आहे ?**

(1) वरच्या पातळीवर जाणे

(2) उड्या मारणे

(3) लेखन

(4) वाचन

**145. वर्गात बहुभाषिकतेला उत्तेजन देण्यासाठी शिक्षिकेने पुढीलपैकी कोणता प्रश्न विचारणे योग्य ठरेल ?**

(1) फुगे किती उंच उडतात.

(2) स्वतःच्या भाषेतील भाज्यांची नावे लिहा.

(3) तुमच्याकडे पाळीव प्राणी आहे.

(4) तुम्ही अक्षरे लिहिलीत.

**146. खालच्या वर्गात लहान लहान ध्वनी किंवा यमकांचा वापर केल्याने ....**

(1) मुलांना अपेक्षित भाषा बोलण्याची संधी मिळते.

(2) मुलांना अनुशासन लागते.

(3) मुलांना अपेक्षित भाषेचे व्याकरण शिकण्याची संधी मिळते.

(4) मुलांना अवघड शब्द समजण्यात आणि त्या आधारे वाक्य तयार करण्यास मदत मिळते.

**147. शिक्षिका वर्गात श्रवण उपक्रम घेण्याचे ठरवते. मुलांना उपक्रमात सहभागी करून घेण्यासाठी ती बुद्धिमंथन करणारे काही उपक्रम तयार करते, म्हणजे/अर्थात चर्चा आणि उत्सुकता निर्माण करणारे, छाननी करणारे प्रश्न इत्यादी. या प्रकारची तयारी म्हणजे ...**

(1) श्रवणपूर्व उपक्रम

(2) श्रवणासह उपक्रम

(3) श्रवणोत्तर उपक्रम

(4) श्रवणाचा अनुवर्ती उपक्रम

**148. भाषावर्गात चित्रे/तक्ते यांचा वापर करण्यासंदर्भात कोणती बाब बरोबर नाही ?**

(1) मुलांना चित्रांचे निरीक्षण करण्याची संधी मिळते.

(2) मुलांना चित्रांच्या आधारे स्वतःला व्यक्त करण्याची व लिहिण्याची संधी मिलते.

(3) मुलांना वर्गात कल्पनाविश्वात रमण्याची आणि सृजनशीलतेत रमण्याची संधी मिळते.

(4) श्रवण क्षमता विकसित करण्चायी संधी मिळते.

**149. आरंभीच्या साक्षरतेत पुढील बाब देखील लेखनप्रकारात मोडते.**

(1) पत्र लिहिणे

(2) शब्द लिहिणे

(3) वाक्य तयार करणे

(4) रेखांकन

**150. शिकणाऱ्याचे भाषिक ज्ञान तपासण्यासाठी कोणती बाब सर्वात महत्त्वाची आहे ?**

(1) चेक लिस्ट

(2) रेटिंग स्केल

(3) पोर्टफोलियो

(4) संभाषण

**SPACE FOR ROUGH WORK**

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें ।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉल पॉइन्ट पेन** से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
5. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी । इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए ।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्वीच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए । इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित ।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान हाज़िरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
12. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल / कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY:**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his / her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***